महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

जनसंपर्क विभाग : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
'प्रकाशगड', प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, ४ था मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in दूरध्वनी : ०२२-६९८५२२०० ईमेल-prodiscomm@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३४३५, १८००-२१२-३४३५, १९१२, १९१२० Follow us on :



प्रेसनोट - दि. 05 ऑक्टोबर 2026

दिवाळीच्या शुभपर्वावर थकबाकीमुक्तीसाठी विविध सवलती जाहीर

'बिगरकृषी' ग्राहकांना थकबाकीमुक्तीची संधी; उद्यापासून महावितरणची 'अभय योजना' २०२६-२७

- Δ महावितरण सी.एम.डी लोकेश चंद्र यांच्याहस्ते योजनेला प्रारंभ
- Δ संपूर्ण व्याज, विलंब आकार १०० टक्के माफ
- Δ एकरकमी भरणा केल्यास मूळ थकबाकीमध्ये २० टक्क्यांपर्यंत सवलत

मुंबई, दि. ५ नोव्हेंबर २०२६: दिवाळीच्या शुभपर्वाचे औचित्य साधत महावितरणने मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वीजबिलांच्या थकबाकीमुक्तीसाठी लघु व उच्चदाबाच्या कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित बिगरकृषी वीजग्राहकांसाठी महावितरणची 'अभय योजना २०२६-२७' जाहीर केली आहे. शुक्रवार (दि. ६ नोव्हेंबर) पासून ते १५ जानेवारी २०२७ पर्यंत या योजनेची अंमलबजावणी केली जाणार आहे.

थकबाकीमुक्तीसाठी घसघशीत सवलतींचा समावेश असणाऱ्या अभय योजनेअंतर्गत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार १०० टक्के माफ करण्यात येणार आहे. तर उर्वरित मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास त्यात आणखी २० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे. यासह मागणीनुसार पुनर्जोडणी तात्काळ मिळणार आहे.

प्रकाशगड मुख्यालयात मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि. ५) या योजनेचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी संचालक श्री. धनंजय औंढेकर (संचालन), श्री. अनुदीप दिघे (वित्त), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) आदींची उपस्थिती होती.

दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत ज्या उच्च व लघुदाब वर्गवारीमधील थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित झाला आहे असे घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर बिगरकृषी (शेती व सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजना वगळून) ग्राहक तसेच दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेले ग्राहक 'अभय योजना २०२६-२७' साठी पात्र आहेत. तसेच महावितरण डिस्ट्रीब्यूशन फ्रॅन्चाईजीमधील ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

या योजनेत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याजाची आणि विलंब आकाराची रक्कम १०० टक्के माफ करण्यात येईल. मूळ थकबाकीची रक्कम एकाच वेळी किंवा हप्त्यांनी भरण्याची ग्राहकांना सुविधा आहे. ही योजना सुरू झाल्यापासून १५ डिसेंबरपर्यंत मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा करणाऱ्या ग्राहकांना 'अर्ली बर्ड रिबेट'चा फायदा देण्यात येईल. यात लघुदाब घरगुती व व्यावसायिक ग्राहकांना ३ वर्षांपर्यंत वीजजोडणी कायमस्वरूपी खंडित असल्यास १० टक्के तर ३ वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून कायमस्वरुपी खंडित असल्यास २० टक्के सवलत मिळेल. तसेच लघुदाब घरगुती व व्यावसायिक वगळून इतर सर्व लघु व उच्चदाब ग्राहकांना अनुक्रमे १० टक्के व १५ टक्के सूट मिळेल. लघुदाब ग्राहकांना ५० टक्के डाऊन पेमेंट भरून उर्वरित रकमेसाठी ६ समान व्याजमुक्त मासिक हप्ते तर उच्चदाब ग्राहकांना थकबाकीनुसार व्याजमुक्त ३ ते ६ हप्त्यांची सुविधा उपलब्ध असेल.

यासोबतच मंजूर भार २० किलोवॉटपर्यंत आहे अशा ग्राहकांनी पुनर्जोडणीच्या वेळी 'प्रीपेड स्मार्ट मीटर'चा पर्याय निवडल्यास मूळ थकबाकीमध्ये अतिरिक्त ५ टक्के सवलत दिली जाईल. उल्लेखनीय म्हणजे या योजनेत सहभागी सर्व ग्राहकांसाठी पुनर्जोडणी शुल्क आणि लघुदाब ग्राहकांसाठी सर्व्हिस कनेक्शन शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे.

दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत कृषी आणि सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजना वगळून इतर सर्व घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेल्या १८३५ उच्चदाब आणि ३४ लाख ८४ हजार ५१३ लघुदाब अशा ३४ लाख ८६ हजार ग्राहकांकडे ७ हजार ६५० कोटी रुपयांची एकूण थकबाकी आहे. यातील २ हजार ९२ कोटी रुपयांचे व्याज व विलंब आकार माफ होणार आहे. तसेच दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेल्या उच्चदाबाच्या १९ आणि लघुदाबाच्या २ लाख ६० हजार ८१० अशा २ लाख ६० हजार ८२९ ग्राहकांकडे ४८८ कोटी ७८ लाख रुपयांची एकूण थकबाकी आहे. यात १६३ कोटी ९३ लाख रुपयांचे संपूर्ण व्याज माफ होणार आहे.

'अभय योजना २०२६-२७' साठी अर्जाची प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. महावितरणच्या ऑनलाइन पोर्टल किंवा मोबाईल ॲपद्वारे ग्राहक अर्ज करू शकतील. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

